www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

दैनिक
तरुणांचा बुलंद आवाज
# युवक आधार
मराठी

दैं. युवक आधार करीता प्रतिनिधी नेमने आहे.
मुंबई, ठाणे नाशिक, रायगड , आलिबाग खोपोली ,पुणे , सांगली , सातारा ,कोल्हापूर, अहमदनगर, औरंगाबाद, बीड, नांदेड, शहर प्रतिनिधी नेमने आहे.
9220403509 संपर्क 9594509661
श्री.संतोष शिवदास आमले | श्री. सुरेश आत्माराम भोईर

मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले उपसंपादक - श्री.विलास मनोहर गायकवाड कार्यकारी संपादक - श्री.सुरेश आत्माराम भोईर निवासी संपादक - श्री. राकेश जनार्दन पाटील सह संपादक : मुकुंद कांबळे

वर्ष : २ अंक : 161 वार मंगळवार दि. २५ फेब्रुवारी २०२५ किंमत : ४ रु पृष्ठ : ४
RNI MAHMAR/2023/89514

## . वसंतनगर श्री.पंचमुखी मुक्तेश्वर महादेव मंदिर येथे महाशिवरात्रीनिमित्त ह.भ.प.नितीन महाराज यांचे कीर्तन..

दैनिक युवक आधार –
संतोष पुदाले

तुळजापूर धाराशिव नळदुर्ग वसंतनगर येथील श्री.पंचमुखी मुक्तेश्वर महादेव मंदिर येथील महाशिवरात्र निमित्ताने दि.२६ फेब्रुवारी बुधवार रोजी सकाळी सात वाजता आरती व तसेच दिवसभर महाप्रसादाचा कार्यक्रम ठेवण्यात आले आहे व सायंकाळी सात वाजता महाआरती करून संध्याकाळी ९ वाजता औसा येथील ह.भ.प. नितीन (महाराज) जगताप यांचे कीर्तनाचे कार्यक्रम ठेवण्यात आले आहे तरी नळदुर्ग व नळदुर्ग परिसरातील सर्व महिला आणि पुरुष मंडळांनी कीर्तनास जास्तीत जास्त संख्यांनी उपस्थित रहावे असे आवाहन वसंतनगर येथील श्री. पंचमुखी मुक्तेश्वर महादेव मंदिराचे पुजारी ह.भ.प. श्री.शामानंद महाराज यांनी केले आहे

**स्थळ -- पंचमुखी महादेव मंदिर वसंतनगर नळदुर्ग**




# बांगलादेशसह पाकिस्तान आउट !

## न्यूझीलंडच्या विजयासह भारतीय संघानंही गाठली सेमी फायनल

रचिन रविंद्रची शतकी खेळी आणि टॉम लॅथमच्या अर्धशकाच्या जोरावर न्यूझीलंडच्या संघानं रावळपिंडीचं मैदान मारलं आहे. टॉस जिंकून मिचेल सँटनरन बांगलादेशच्या संघाला पहिल्यांदा फलंदाजी करण्यास निमंत्रित केले होते. बांगलादेशच्या संघानं कर्णधार शांतोच्या शानदार ७७ धावांच्या खेळीच्या जोरावर निर्धारित ५० षटकात ९ बाद २३६ धावा करत न्यूझीलंडसमोर २३७ धावांचे आव्हान ठेवले होते. न्यूझीलंडच्या संघानं पाच विकेट्स राखून हे आव्हान सहज पार केले. न्यूझीलंडच्या विजयासह बांगलादेशचा यंदाच्या हंगामातील प्रवास इथंच थांबला आहे. एवढेच नाही तर यजमान पाकिस्तानही स्पर्धेबाहेर पडला आहे. दुसरीकडे भारत-न्यूझीलंड यांचे सेमीच तिकीट पक्के झाले.



आता 'अ' गटात या दोन्ही संघात टॉपर कोण? यासाठी लढाई रंगल्याचे पाहायला मिळेल.

बांगलादेशच्या संघाने दिलेल्या धावांचा पाठलाग करताना न्यूझीलंड संघाची सुरुवात खराब झाली. विल यंगच्या रुपात तस्कीन अहमदनं किवींना पहिल्याच षटकात धक्का दिला. त्याला खातेही उघडू दिले नाही. संघाच्या धावफलकावर १५ धावा असताना केन विलियम्सन ४ चेंडूत ५ धावा करून तंबूत परतला. डेवॉन कॉन्वेनं चांगली सुरुवात केली. पण मोठी खेळी करण्यात तोही कमी पडला. ४५ चेंडूत ३० धावांवर त्याने विकेट गमावली. न्यूझीलंडच्या संघानं ७२ धावांवर आघाडीचे तीन फलंदाज गमावले होते.

रचिन रविंद्र टॉम लॅथमच्या शतकी भागीदारीनं सेट झाला सामना

पहिल्या तीन विकेट्स अगदी स्वस्तात गमावल्यावर रचिन रविंद्र आणि विकेट किपर बॅटर टॉम लॅथम ही जोडी जमली. दोघांनी चौथ्या विकेटसाठी १२९ धावांची दमदार भागीदारी रचली. शतकी खेळीसह संघाच्या धावफलकावर द्विशतकी धावसंख्या लागल्यावर रचिन रविंद्र बाद झाला. त्याने १०५ चेंडूत १२ चौकार आणि एका षटकाराच्या मदतीने ११२ धावांची खेळी केली.

## अवैध दारू विक्रीप्रकरणी हॉटेल चालकावर गुन्हा दाखल

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी -योगेश पालोदकर**

**सिल्लोडः-** तालुक्यातील हळदा येथील एका हॉटेलवर अजिंठा पोलीस यांनी छापा मारून अवैधरित्या देशी व विदेशी दारू विक्री केल्याप्रकरणी हॉटेल चालक भारत शंकर उबाळे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला.



अजिंठा पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार आरोपी भारत शंकर उबाळे (रा.हळदा,ता. सिल्लोड,जि.छत्रपती संभाजीनगर) हा हॉटेल भाग्यश्री मध्ये चोरट्या पद्धतीने देशी विदेशी दारू विक्री करत असल्याची माहिती मिळाली होती. मिळालेल्या माहितीनुसार सापळा रचून हॉटेलवर छापा मारला असता या छाप्यामध्ये देशी विदेशी कंपनीच्या बाटल्या आढळून आल्या. त्या जप्त करून भारत उबाळे यांच्या विरोधात महाराष्ट्र दारू बंदी कायदा कलम ६५ (ई) नुसार पो. कॉ. विजय पवार यांच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल केला आहे. अधिक तपास अजिंठा पोलीस ठाण्याचे सपोनि. अमोल ढाकणे यांच्या मार्गदर्शनाखाली कॉन्स्टेबल डी.एस.तडवी,विजय पवार हे करत आहे.




**दैनिक युवक आधार - :** ठाणे महानगरपालिका आणि जनकवी पी. सावळाराम कला समिती, ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने देण्यात येणारा सन २०२४चा जनकवी पी. सावळाराम स्मृती पुरस्कार ज्येष्ठ अभिनेते उदय सबनीस यांना तर, गंगा-जमुना पुरस्कार अभिनेत्री लीना भागवत यांना रविवारी खासदार नरेश म्हस्के यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. शिक्षण क्षेत्रातील अरुंधती भालेराव, साहित्य क्षेत्रातील निकिता भागवत यांचा तर, लक्षवेधी कलाकार पुरस्काराने अभिनेते दत्तात्रय तथा दत्तू मोरे यांचाही सन्मान खासदार नरेश म्हस्के यांच्या हस्ते करण्यात आला. **(फोटो -अमित जाधव )**

## आमदार दिलीप बनकर यांच्या हस्ते निफाड पंचायत समिती येथे घरकुल लाभार्थ्यांना मंजुरी पत्राचे वितरण.

### निफाड तालुक्यातील ५८७६ मंजूर लाभार्थ्यांना मिळणार हक्काचे घरे

**दैनिक युवक आधार**
**उत्तर महाराष्ट्र विभागीय संपादक**
**विनोद गायकवाड**

ग्रामीण भागासाठी प्रधानमंत्री आवास योजना ही शासनाने सुरू केलेली महत्त्वाची योजना असून, या योजनेचा ग्रामीण टप्पा दोन मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी महाराष्ट्रासाठी सुमारे वीस लाख घरांचे उद्दिष्टे दिले आहे, त्याप्रमाणे मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांनी राज्यातील वीस लाख लाभार्थ्यांना मंजुरी पत्र देणे तसेच दहा लाख लाभार्थ्यांना पहिला हप्ता अनुदान वितरणाचा कार्यक्रम दिनांक २२ फेब्रुवारी २०२५ रोजी दुपारी व्हिशीद्वारे सर्वत्र घेण्यात आला आहे. निफाड पंचायत समिती येथेही आमदार दिलीप बनकर यांचे प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम घेण्यात आला. याप्रसंगी मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन व प्रतिमा पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली याप्रसंगी प्राथमिक स्वरूपात उपस्थित पाच घरकुल लाभार्थ्यांना आमदार बनकर यांच्या हस्ते मंजुरी पत्र देण्यात आले, तालुक्यातील ५८७६ लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळणार आहे,

यावेळी निफाड चे गटविकास अधिकारी तुकाराम जाधव सहाय्यक गट विकास अधिकारी सुनील पाटील विस्तार अधिकारी राजेश थोरात प्रशांत बोरसे तसेच ग्रामपंचायत सरपंच उपसरपंच सदस्य सर्व खात्यातील अधिकारी कर्मचारी लाभार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते या ऑनलाइन कार्यक्रमाचा सर्वांनी लाभ घेतला



# श्री स्वामी नरेंद्राचार्यजी महाराजांचा एकेरी उल्लेख करून अपशब्द वापरणाऱ्या काँग्रेसच्या विजय वडेट्टीवाराचा उरण-कोप्रोली मध्ये निषेध.




**दैनिक युवक आधार**
**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख/एम.डी.भोईर**

स्व स्वरूप संप्रदाय तालुका उरण जिल्हा सेवा समिती उत्तर रायगड तर्फे जाहीर निषेध विधानसभा निवडणुकीत २०२४ मध्ये संघ आणि संघ प्रणित साधू संत यांनी हिंदुत्व वाचविण्यासाठी जनजागरण केले.साधू संत पाठीशी असल्यामुळे महायुतीचा विजय झाला. नरेंद्र महाराज यांचेही सहकार्य लाभले असे मत राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी एका कार्यक्रम दरम्यान मत व्यक्त केले. या व्यक्तव्या मुळे आता महाराष्ट्रातील राजकारण चांगलेच तापले आहे. काँग्रेसचे नेते, काँग्रेसचे आमदार विजय वडेट्टीवार यांनी जगद्गुरू रामानंदाचार्य नरेंद्राचार्य महाराजांचा एकेरी उल्लेख करत त्यांना अपशब्द बोलत त्यांचा अपमान केला.त्यामुळे संतप्त झालेल्या श्री स्वामी नंतद्राचार्यांचे शिष्य गणांनी,भक्त गणांनी संपूर्ण महाराष्ट्रात विजय वडेट्टीवार यांच्या विरोधात निषेध आंदोलन केले.उरण मध्ये सायंकाळी 6:00 वाजता उरण कोप्रोली नाका येथे स्व स्वरूप संप्रदाय तालुका उरण जिल्हा सेवा समिती उत्तर रायगड यांच्या माध्यमातून विजय वडेट्टीवार यांचा जाहिर निषेध करण्यात आला. यावेळी 500 हुन अधिक भाविक भक्त, शिष्यगण यावेळी उपस्थित होते. माफी मांगो, माफी मांगो विजय वडेट्टीवार माफी मांगो, हिंदू धर्माचा विजय असो, साधू संताचा अपमान करणाऱ्यांचा जाहीर निषेध, जगद्गुरूंचा अपमान करणाऱ्यांचा जाहीर निषेध अशा शब्दात घोषणा देत विजय वडेट्टीवारांच्या प्रतिमेला जोडे मारत घोषणाबाजी करत यावेळी निषेध करण्यात आला. यावेळी भाविक भक्त, शिष्यगण आक्रमक झालेले दिसून आले. विजय वडेट्टीवारांनी आपल्या वक्तव्या विषयी जगदगुरु नरेंद्रचार्यांची जाहीर माफी मागावी अशी मागणी यावेळी भाविक भक्त, शिष्य गणांनी केली आहे.




## संपादकीय

# गाडगेबाबा जयंतीनिमित्त

आज एका अशा महाराजांची जयंती आहे की, ते नियतीला पडलेलं कोडं ठराव! कारण ते महाराज कीर्तनकार होते. पण ते "देवळात जाऊ नका, मूर्तीपूजा करू नका असं सांगायचे, शिकलेले नव्हते. मात्र, शिक्षणाचे महत्त्व आपल्या किर्तनातून सांगताना अडाणी राहू नका, असा संदेश द्यायचे. सावकाराचे कर्ज काढू नका असं म्हणत आर्थिक बाबतीत सजग राहण्याचे ज्ञान द्यायचे. आरोग्याची काळजी घेण्यासाठी स्वतः गावाची स्वच्छता करायचे... अशा संत गाडगे महाराजांची आज जयंती...

**"बाप हो,,,,,**
पैसे नसेल तर जेवणाचे ताठ मोडा,
हातावर भाकरी खा,
बायकोले लुगडे कमी भावाचे घ्या,
पण मुलाले शाळेत घातल्या शिवाय राहू नका,"

असा संदेश देणारे संत गाडगे बाबा! डोक्यावर झिंज्या, त्यावर खपराच्या तुकड्याची टोपी, एका कानात कवडी, तर दुसऱ्या कानात फुटक्या बांगडीची काच, एका हातात झाडू, दुसऱ्या हातात मडके, असा पेहराव असणारा संत समाजाला उपदेश करत राहिला, संत कबीर आणि संत रोहिदास यांच्या विचारांची परंपरा चालवणारा हा महामानव, हिंसा बंदी, दारुबंदी, पशुबळी प्रथा निवारण, अस्पृश्यता निवारण करत राहणारा या संताने, दीन, दलित, अपंग आणि पिढीतांच्या सेवेमध्ये त्यांचं संपूर्ण आयुष्य अर्पन केलं. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्यावर तर ते खूपच आनंदी होते. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या शैक्षणिक कार्यावर ते लोकांना मदतीचे आवाहन करायचे. बाबासाहेब माझे गुरू होऊ शकतात असे बोलायचे, मी न शिकलेला माणूस, रस्त्यावर उतरून लोकांना चांगल सांगणारा पण डॉ बाबासाहेब आंबेडकर म्हणजे लोकांच्या कल्याणासाठी कायद्याचा आधार देणारा माणूस अशी पोहोच पावती ते द्यायचे. तुफानातील दिवे या कथासंग्रहात डॉ बाबासाहेब आंबेडकर आणि संत गाडगे बाबा यांच्यातील भेटीचा एक प्रसंग आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची एक सभा सुरु होती. तिथे गाडगे महाराज पोहचले अचानक गाडगे बाबांना पाहून बाबासाहेब देखील अचंबित झाले. वर केलेल्या दोन्ही हातात हार घेउन स्टेजसमोर उभ्या असलेल्या गाडगे महाराजांना बाबासाहेब म्हणाले. "बाबा तुम्ही खाली का उभे? वर या ना." "नाही बाबासाहेब तुम्हीच खाली या आणि या अडाण्याचा हार घ्या." "बाबा, तुम्ही अगोदर वर या मग मी हार घेईन" "नाही बाबासाहेब, तुम्हीच आधी खाली या." बराच वेळ ते दोन महापुरूष एकमेकांना विनंत्या करीत होते. बाबासाहेबांच्या भाषणाची तार तुटली होती. वेळ होत होता म्हणून बाबासाहेब जरा रागातच म्हणाले. "बाबा तुम्ही, स्टेजवर का येत नाही..? त्यावर ते संतशिरोमणी गाडगे महाराज शांतपणे स्नेहाद्र आवाजात बोलले." बाबासाहेब



तुम्ही ज्या स्टेजवर उभे आहात, त्या स्टेजला पाय लावायची माझी तरी लायकी नाही.'' गाडगेबाबांच्या तोंडून असे बोल बाहेर पडताक्षणीच बाबासाहेब मंचावरून खाली उतरले. त्या महान संतांची पुष्पमाला स्वीकारली आणि दोघांनी एकमेकांना प्रेमाने कडकडून मिठी मारली. "आता तुमचे चालू द्या." असे बोलून क्षणांत गाडगे महाराज निघून गेले. याला म्हणतात एका निष्कलंकित चारिञ्याने दुसऱ्या निष्कलंकित चारिञ्याची केलेली कदर... संतांचा निरोप घेऊन बाबासाहेब मंचाकडे वळले तर काय आश्चर्य... स्टेजवरील सर्व खुर्च्या रिकाम्या. सर्व नेते व कार्यकर्त्यांनी खाली प्रेक्षकांत बसणे पसंत केले. बाबासाहेब एकटेच मंचावरून भाषण देत होते आणि श्रोते मंत्रमुग्ध होऊन ऐकत होते. जेव्हा गाडगेबाबांचे कीर्तन चालू असायचे. तेव्हा बाबासाहेब तिथे गेल्यावर खालीच बसायचे. लोक त्यांना म्हणायचे की बाबासाहेब आपण वर बसा. पण बाबासाहेब मात्र, खालीच बसायचे. 'जेथे संत गाडगेबाबा असतील तेथे घाण असूच शकत नाही. ''स्वतःच्या मुलाच्या मृत्यूने गाडगेबाबांवर कुठलाही परिणाम झाला नाही. परंतु बाबासाहेबांचा मृत्यू झाला हे समजल्यावर अवघ्या १४ दिवसात प्राण सोडणारे संत गाडगेबाबांचे आणि बाबासाहेबांचे संबंध कसे असतील? याची जाणीव यातून होते. संत गाडगे महाराज म्हणजे चालते बोलते विद्यापीठ होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शिक्षण संस्थेला पंढरपूर येथील धर्मशाळा उपलब्ध करुन दिली होती. स्वतः एकही दिवस शाळेत न जाणाऱ्या संत गाडगे महाराजांना शिक्षणाचे महत्व समजले होते. आजही गाडगे महाराजांचे विचार आपल्या पिढीला प्रेरक ठरणारे आहेत. सामान्य जनता त्यांचे कीर्तन ऐकण्यासाठी गर्दी करीत असे. आपल्या रसाळ वाणीने आणि रोकड्या उपदेशाने भल्या भल्या धर्म प्रमुखांनी त्यांच्या समोर तोंडात बोटं घातली. ते कीर्तनाला उभे राहिले की, लोकांच्या सद्सद्विवेक बुद्धीला आवाहन करत

**"लोकहो...**
देव तीर्थात किंवा मूर्तीत नाही,
दरिद्री नारायणाच्या रूपाने
तो तुमच्या समोर उभा आहे,
दीन दुबळ्यांच्या डोळ्यातील एक अश्रू पुसला की, देवाला एक अभिषेक घडतो हो..." असे प्रवचन ते करायचे, खरं तर गाडगे महाराज हे "संतांमधील सुधारक आणि सुधारकामधील संत होते"

आजच्या पिढीतील काही संताची किर्तन ऐकल्यानंतर वैज्ञानवादी, गोरगरीबांच्या प्रश्नावर, आरोग्यावर, आर्थिक परिस्थिती वर बोलणारे किर्तनकार दुर्मिळ होते आहेत का? असा प्रश्न निर्माण होतो.

# चिखलवर्धा ते पाटापंगारा घाट रस्त्याच्या बिघडत्या स्थितीबाबत तातडीने कारवाई करण्याची गरज स्पष्टपणे अधोरेखित करण्यात आली आहे.

**दैनिक युवक आधार**
**घाटंजी तालुका प्रतिनिधी - महेश पेंन्दोर**

*या संबंधित विभागाकडून सतत दुर्लक्ष केल्याने प्रवाशांची सुरक्षितता धोक्यात येतेच, शिवाय गंभीर अपघातांचा धोकाही वाढतो, ज्यामुळे जीवितहानीसह दुःखद परिणाम होऊ शकतात. सरकारी अधिकाऱ्यांसाठी सार्वजनिक सुरक्षितता ही सर्वोच्च प्राथमिकता असली पाहिजे आणि त्यांनी या चिंतांना त्वरित प्रतिसाद देणे आवश्यक आहे. घाटंजी तालुक्यातील - चिखलवर्धा ते पाटापंगारा घाट रस्त्याच्या बिघडत्या स्थितीबाबत तातडीने कारवाई करण्याची गरज स्पष्टपणे अधोरेखित करण्यात आली आहे. देखभालीचा अभाव, विशेषतः खड्डे बुजवण्यात अपयश, यामुळे चालक आणि प्रवाशांना मोठा धोका निर्माण



होतो. दुचाकीस्वारांना झालेल्या दुखापती या रस्त्यावरील धोक्यांवर भर देतात. तात्काळ दुरुस्तीची जनतेची मागणी अत्यंत महत्त्वाची आहे, कारण दीर्घकाळ दुर्लक्ष केल्यास गंभीर अपघात होऊ शकतात किंवा मृत्यू देखील होऊ शकतात.

**जैतुजी मेश्राम, सरपंच, (चिखलवर्धा)**
चिखलवर्धा ते पटापांगरा मार्ग अत्यंत व्यस्त आहे आणि दोन्ही गावांचे लोक येथे सतत ये-जा करत आहेत. या घाटातील रस्त्याची स्थिती अत्यंत खराब आहे, ज्यामुळे अपघात आणि जनहानि होण्याची शक्यता नाकारता येत नाही...
यामुळे, आम्ही संबंधित विभागाकडे विनंती करतो की या घाटाच्या रस्त्याचे काम लवकरात लवकर सुरू करण्यात यावे.

**बजरंग दल पाटा - पांगरा कार्यकर्ते**

संबंधित विभागाने परिस्थितीचे गांभीर्य ओळखणे आणि सर्व प्रवाशांच्या सुरक्षिततेची खात्री करण्यासाठी रस्त्याच्या देखभालीला प्राधान्य देणे अत्यंत आवश्यक आहे. स्थानिक माध्यमांद्वारे किंवा सामुदायिक बैठकींद्वारे जागरूकता वाढवल्याने या महत्त्वाच्या समस्येकडे लक्ष वेधण्यास आणि वेळेवर हस्तक्षेप करण्यास मदत होऊ शकते.

संयोजक प्रदीप जाधव , सहसंयोजक . ऋषिकेश गुल्हाने , गौरक्षक प्रमुख.भावेश गुल्हाने, शालेय शिक्षण. प्रमुख उदय सावरबंदे, बल प्रमुख अक्षय गुल्हाने , सह प्रशांत निकोडे , सह अनुज होळकर , सह ऋषिकेश गुल्हाने , सह क्रिश गुल्हाने ,सह वेदांत डेहनकर ,सह रवी होळकर यांची असी विनंती आहे..!

# युगायुगांचे नाते अपुले,नको दुरावा..."



माणूस हा सहवास आणि प्रेमाचा भुकेला असतो. असं म्हणतात, प्रेम दिल्याने ते वाढते. मुळात प्रेमाची व्याख्या करताच येणार नाही. अनेक गायक गायिकांनी प्रेमावर गाणी गायली आहेत ती ऐकली की असे वाटते, हेच आपल्या मनातील भाव आहेत. कडक वैशाख वणव्याच्या उन्हात आपला जोडीदार आपल्या सोबत असेल तर ती ऊन्हाची झळ देखील सुसह्य होते. म्हणून तर गाण्याची ओळ आहे, "आज चांदणे उन्हात हसले तुझ्यामुळे..."मनासारखा जोडीदार मिळायला देखील भाग्यच लागते. मग तो गरीब असो किंवा श्रीमंत, त्याचा सहवास हाच आधार असतो. या प्रसंगावर लता दीदींनी स्वरसाज चढवला आहे, "प्रेमा काय देऊ तुला, भाग्य दिले तू मला..."प्रेम हे नेहमीच शब्दात व्यक्त करावे असे काही नाही. ते व्यक्त करण्यासाठी परमेश्वराने निर्माण केली ती फुलं. हातात घेतलेल्या फुलाला देखील प्रेमाचा गंध असतो. ती जरी मुकी असली तरी भावना ओठावर आणायला मदत करतात. "धुंदी कळ्यांना धुंदी फुलांना, शब्दरूप आले मुक्या भावनांना..."प्रेमामध्ये आयुष्य सुखमय करण्याची ताकद असते. एका ठराविक वयात प्रेमाची, हक्काची व्यक्ती आयुष्यात येणं देखील गरजेचे असते. काही मनातील गोष्टी बोलण्यासाठी जोडीदार असावा लागतो. यावर एक आशा ताईंनी गायलेल्या ओळी लिहिण्याचा मोह आवरत नाही, "अधरी जे अडत असे, सांगिन तुज गुज असे प्रीति ही प्रीतिविण अजूनही अबोली. "आयुष्याची सुरुवात हीच मुळात प्रेमापासून होते. जन्म देणारी आई ही पहिली ते साथ देणारी, कठीण प्रसंगी हात देणारी सहचारिणी किंवा जोडीदार या प्रवासावर व.पु. म्हणतात, "आयुष्यात एक क्षण भाळण्याचा असतो तर उरलेले क्षण हे सांभाळण्याचे असतात."जोडीदार जिथे कमी पडेल तिथे आपण उभे राहायचे असते. सप्तपदी पासून धरलेला हात हा अखेरच्या टप्प्या पर्यंत हातात असणं म्हणजेच सहजीवन नाही का!! अशा या सहजीवनावर एकच ओळ लिहावीशी वाटते,

**"युगायुगांचे नाते अपुले,नको दुरावा,**
**सहवासाची ओढ निरंतर, नको दुरावा..."**

**- गोकुळभाऊ सानप -**
**पत्रकार, रायमोहाकर**

# पत्रकार अँड.महेश बेदरे मौलाना आझाद राज्यस्तरीय आदर्श पत्रकारिता पुरस्काराने सन्मानित.

### प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाला भव्य दिव्य पुरस्कार वितरण सोहळा...

**दैनिक युवक आधार**
**पाटोदा (प्रतिनिधी) -** दैनिक दिव्य मराठीचे पाटोदा तालुका प्रतिनिधी पत्रकार अँड.महेश श्रीरंग बेदरे यांना दैनिक दिव्य वार्ता व साप्ताहिक कश्मकश परिवाराच्या वतीने दिला जाणारा मानाचा मौलाना आझाद राज्यस्तरीय आदर्श पत्रकारिता पुरस्कार- २०२५ शनिवार दिनांक- २२ फेब्रुवारी २०२५ रोजी बीड येथे झालेल्या भव्य सोहळ्यात प्रमुख मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. दैनिक दिव्य वार्ता, साप्ताहिक कश्मकश चे संपादक अबूबकर व संपूर्ण पुरस्कार निवड समितीच्या वतीने यंदाच्या पुरस्कारासाठी दैनिक दिव्य मराठीचे पाटोदा तालुका प्रतिनिधी पत्रकार अँड. महेश बेदरे यांचे नाव जाहीर करण्यात आले होते. शनिवार दिनांक -२२/०२/२०२५ रोजी सायंकाळी बीड या ठिकाणी कोहिनूर लान्स येथे झालेल्या भव्य समारंभात महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्डाचे चेअरमन समीर काझी, विधान परिषद सदस्य आमदार इद्रीस नाईकवाडी यांच्या सह संपादक अबूबकर, मौलाना शफिक शेख कासमी, मुफ्ती अब्दुल्लाह कासमी, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई चे राज्य समन्वयक तथा दैनिक लोकप्रभा चे संपादक संतोष मानूरकर, दैनिक लोकाशा चे संपादक विजयराज बंब, हाफिज जाकीर सिद्दिकी, सलीम जहांगीर, एम आय एम चे शफिक भाऊ यांच्या सह उपस्थित प्रमुख मान्यवरांच्या हस्ते पत्रकार अँड.महेश बेदरे यांना सन्मानचिन्ह व मानपत्र असा पुरस्कार प्रदान करण्यात आला. या प्रसंगी कुटुंबीयांसह आमदार सुरेश धस यांचे स्वीय सहाय्यक तथा पाटोदा तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष सोमीनाथजी कोल्हे, पत्रकार हमीद खान पठाण, श्रीकांत धसे पत्रकार शेख जावेद, शेख महेशर, राजू भाई पठाण, सचिन शिंदे, रविद्र गुंड यांच्या सह मित्र परिवार, आप्तेष्ट व मान्यवरांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. पत्रकार अँड.महेश बेदरे यांना पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात येत असून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या जात आहेत.




# रविवारी ग्रंथालय बंद ; स्पर्धा परीक्षेच्या विद्यार्थ्यांचे मोठे नुकसान

**दैनिक युवक आधार**
**महाराष्ट्र प्रतिनिधी**



रविवारी सकाळी अभ्यासासाठी आलेल्या अनेक विद्यार्थ्यांना उरण नगर परिषदेच्या मॉसाहेब मिनाताई ठाकरे ग्रंथालयाचे दरवाजे पाहून निराश व्हावे लागले. नवीन वेळापत्रकानुसार शनिवारी अर्धा दिवस आणि रविवारी तसेच सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी ग्रंथालय बंद राहणार आहे. या निर्णयामुळे स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला आहे.

ग्रंथालयाबाहेर लॉक असलेल्या प्रवेशद्वारासमोर उभ्या विद्यार्थ्यांचा फोटो हा या समस्येची तीव्रता स्पष्ट करणारा आहे. नोकरी करत अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी फक्त संध्याकाळी, पहाटे आणि सुट्टीचे दिवसच अभ्यासाचे एकमेव साधन असतात. आता रविवारी ग्रंथालय बंद राहिल्यामुळे आमच्या अभ्यासावर थेट परिणाम होणार आहे, असे एका विद्यार्थ्याने सांगितले. संध्याकाळी आणि आठवड्याभरातील गोंधळामुळे अभ्यास करणे कठीण झाले आहे.त्यात संपूर्ण आठवडाभर ग्रंथालया शेजारील क्रीडा संकुलातील गोंधळामुळे शांततेत अभ्यास करणे कठीण असते मात्र, रविवार आणि सुट्टीचे दिवस शांत वातावरण असल्याने अनेक विद्यार्थी त्याठिकाणी तासंतास अभ्यास करू शकत होते. मात्र उरण नगर परिषदेच्या नवीन वेळापत्रकानुसार शनिवारी अर्धा दिवस आणि रविवारी तसेच सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी ग्रंथालय बंद राहणार असल्याने आता हा एकमेव शांत दिवसही अभ्यासासाठी राहिला नाही. माजी रायगड जिल्हाधिकारी महेंद्र कल्याणकर यांच्या पुढाकाराने ग्रंथालयात आठवड्याच्या शेवटी विविध सामाजिक, आर्थिक, आणि वैज्ञानिक विषयांवर चर्चा सत्रांचे आयोजन केले जात होते. या सत्रांमुळे विद्यार्थ्यांना परस्परांशी ज्ञानाची देवाणघेवाण करता येत होती, तसेच त्यांच्या शंकांचे निरसन करता येत होते. या निर्णया विरोधात विद्यार्थ्यांनी नगरपरिषद मुख्याधिकारी, रायगड जिल्हाधिकारी आणि जिल्हा ग्रंथालय अधीक्षक यांना पत्र पाठवून जुने वेळापत्रक पूर्ववत करण्याची मागणी केली आहे. ग्रंथालय म्हणजे ज्ञानाचे मंदिर असते, ते बंद करण्याचा निर्णय विद्यार्थ्यांसाठी घातक आहे. अशा अडथळ्यांमुळे अभ्यासक्रमाचे नियोजन बिघडते आणि समाजाच्या प्रगतीलाही धक्का बसतो, असे एका विद्यार्थ्याने ठामपणे सांगितले. विद्यार्थ्यांनी एकत्र येऊन हा निर्णय मागे घेण्याची जोरदार मागणी केली आहे. याबाबत नगरपालिका प्रशासन काय निर्णय घेते याकडे लक्ष लागले आहे.

# वकील आणि महीला पोलिस अधिकारी यांचेयांनी सायबर गुन्हे आणि आर्थिक फसवणुकी संदर्भात मार्गदर्शन

**दैनिक युवक आधार**
**महाराष्ट्र प्रतिनिधी**




उरण नगरपालिका कर्मचारी सहकारी पतपेढी आणि म्युनिसिपल एम्प्लॉइज युनियन यांच्या संयुक्त विद्यमाने सालाबाद प्रमाणे याही वर्षी आपल्या उरण नगर परिषद कार्यालय येथे महिला कर्मचाऱ्यांकरिता हळदी कुंकू समारंभ नुकताच आयोजित करण्यात आला होता. या निमित्ताने सध्या समाजात विविध पद्धतीने होणारी फसवणूक या संदर्भात आर्थिक, मानसिक, शारीरीक जनजागृती करण्यासाठी उरण पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र मिसाळ, अँड. योगिता म्हात्रे तसेच पोलीस उपनिरीक्षक श्रीमती स्मिता पवार आणि श्रीमती पद्मजा पाटील हे मुख्यमार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. मार्गदर्शन करताना अँड. योगिता म्हात्रे यांनी प्रथमतः उरण नगरपरिषदेमधील सर्व सफाई कामगारांचे कौतुक करताना समाजातील प्रत्येक व्यक्ती आधिकारी असो, पदाधिकारी असो अथवा सामान्य नागरिक असो या सर्वांचे आरोग्य सफाई कामगारांच्या नियमित साफसफाईमुळे सर्वांना आरोग्यदाई जिवन उपभोगण्यासाठी मिळत असते त्याबद्दल सफाई कामगारांचे कौतुक केले आणि आर्थिक फसवणुकी बद्दल आपण जागृत राहणे आवश्यक आहे. पोलीस अधिकारी श्रीमती स्मिता पवार यांनी सायबर गुन्हे मोबाईलचा वापर करताना योग्य काळजी घेतली नाही तर फार मोठी समस्या निर्माण होऊ शकते असे सांगितले.

अनावधानाने एखादी समस्या निर्माण झाली तर आपण तात्काळ पोलीस यंत्रणेबरोबर संपर्क साधणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे पोलिस अधिकारी श्रीमती पद्मजा पाटील यांनी महिलांना मार्गदर्शन करताना उपस्थित महिलांना सांगितले की आपल्याला कोणत्याही प्रकारचा जर त्रास कोणी विनाकारण देत असेल तर त्याची तक्रार आपण स्थानिक पोलीस स्टेशनमध्ये केलीच पाहिजे प्रत्येक पोलीस स्टेशनमध्ये महीला पोलिस उपस्थित असतात असे सांगितले. हा प्रबोधनात्मक कार्यक्रम कामगार नेते संतोष पवार यांच्या मार्गदर्शनाखाली कामगार नेते मधुकर भोईर यांच्या संपूर्ण सहकाऱ्याने यशस्वीपणे पार पाडण्यात आला.

# येणाऱ्या पिढ्या वाचवायच्या असतील तर आधी कोकण वाचवा - मुझम्मील काझी

## जमिनी विकून नोकरी करण्यापेक्षा आहे त्याच जमिनी वाचवून उद्योग धंदे उभारा

**दैनिक युवक आधार**
**कोकण वार्ताहर**

श्री भैरी भवानी मंडळ परचुरी चंदरकर वाडी या मंडळाच्या रौप्य महोत्सवी कार्यक्रमात मुझम्मील काझी यांना प्रमुख अतिथी म्हणून निमंत्रित करण्यात आले होते. पुढे मार्गदर्शन करताना,येणाऱ्या पिढ्या वाचवायच्या असतील तर आधी कोकण वाचवा असे आवाहन मुझम्मील काझी यांनी केले आहे. पुढे आपल्या भाषणात सांगितले की,जमिनी विकून नोकरी करण्यापेक्षा आहे त्याच जमिनी वाचवून उद्योग धंदे उभारा. ग्रामस्थांना मार्गदर्शन करताना मंचावरून मुझम्मील काझी यांनी सांगितले की, आजची पिढी ही खूप भाग्यवान आहे. आजच्या पिढीला सगळं आयत मिळालं आहे. कोणते कष्ट करायचे नाहीत किंवा ना अजून काही. पण येणाऱ्या पिढीला मात्र खूप संघर्ष करावा लागणार आहे. आज आपल्या गावात,आपल्या भागात आपणच परके होत चाललो आहोत, परप्रांतीयांना आपल्या जमिनी विकून मोकळे झालोत. आज अर्ध कोकण हे आपणच विकून टाकलेले आहे. हे कुठे तरी थांबले पाहिजे. पुढे उदाहरण देताना मुझम्मील काझी यांनी म्हटले की, मागेच एक लोकसत्ताला बातमी वाचली होती.साखरपा जवळचे ओझर गाव हे तिथल्या ग्रामस्थांनी विकायला काढले आहे. तब्बल साडेचार हजार एकर जागा विकण्याची पेपरला जाहिरात दिली होती. विचार करा किती गंभीर परिस्थिती आहे. आज त्या गावात तरुण मुलेच नाहीत. फक्त वयोवृद्ध माणसे आहेत. गावात एसटी येत नाही.

मोबाईलला नेटवर्क नाही. गावाकडे लक्ष द्यायला कोणी नाही. किती भयानक परिस्थिती असेल. आज आपली गावे ओस पडत चालली आहेत. आपणच आपली मानसिकता बनवून घेतली आहे. मुलाला मुंबईला नोकरी पाहिजे.दहावी बारावी झाली की बॅग भरून मुंबई गाठायची.कोकणातले सुखी जीवन सोडून धकाधकीच्या जीवनात



जायचे. आपण ठरवलं आहे की,मुलगा मुंबईला असेल तरच मुलगी देणार. मुंबईला नोकरी पाहिजे तरच लग्न करणार भलेही मुलगा तिथे लोकलचे धक्के खाऊ देत. पण इथला शेतकरी नवरा नको. आज जर आपण आपल्या गावात राहून उद्योग सुरू केले तर बाहेर नोकरी करण्याचीही गरज नाही. आपला ग्रामीण भाग निसर्ग संपन्न आहे. निसर्गाने आपल्याला भरभरून दिले आहे.

त्याचा आपण कधी वापर करणार. पर्यावरणपूरक उद्योग धंदे सुरू करून आपण रोजगार निर्माण केला पाहिजे. अजून किती दिवस दुसऱ्यांच्या हाताखाली काम करणार आहोत.आपणही दुसऱ्यांना रोजगार देणारे बनले पाहिजे.

मुझम्मील काझी यांनी तरुणांना मार्गदर्शन करताना आवाहन केले की, आज आपल्या गावाला तरुणांची गरज आहे.इथे तरुण राहिले पाहिजेत.तरच गावाचा विकास करता येईल.पुढे,श्री भैरी भवानी मंडळ परचुरी चंदरकर वाडी या मंडळाच्या रौप्य महोत्सवी कार्यक्रमाला शुभेच्छा देताना त्यांनी म्हटले, आज २५ वर्षे पूर्ण झालीत,येणारी २५०० वर्षे हे मंडळ येणाऱ्या पिढीला आदर्शवत ठरू दे. मंडळाचे कार्य उल्लेखनीय आहे. शासनाच्या सर्व योजनांचा पुरेपूर लाभ घेणारे हे मंडळ आहे.

**मंडळाच्या वतीने सन्मान**

पत्रकार मुझम्मील काझी यांच्या श्री भैरी भवानी मंडळ परचुरी चंदरकर वाडी या मंडळाच्या रौप्य महोत्सवी कार्यक्रमात सन्मान करण्यात आला.यावेळी त्यांना मंडळाचे अनिल चंदरकर यांच्या हस्ते विठ्ठल रखुमाईची मूर्ती आणि पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी मंचावर कार्यक्रमाचे अध्यक्ष दीपक लिंगायत,परचुरी गावच्या सरपंच शर्वरीताई वेल्ये, उपसरपंच प्रदीप चंदरकर,माजी उपसभापती पंचायत समिती परशुराम वेल्ये, तंटामुक्ती अध्यक्ष अनंत शिंदे,पोलिस पाटील सुधीर लिंगायत,ग्रामपंचायत सदस्य, सामाजिक कार्यकर्ते वहिद राजापकर, उक्षी गावचे माजी उपसरपंच हरिश्चंद्र बंडबे, सामाजिक कार्यकर्ते वसंत मेस्त्री, मंडळाचे संजय चंदरकर,डॉ.विनायक पेठे, डॉ.चंद्रकांत लिंगायत, गीतकार मधुकर यादव,शाहीर प्रकाश पंजने,उदय चिबडे,सदाशिव धांगडे, संदेश दुदम व तसेच मंडळाचे सर्व पदाधिकारी, ग्रामस्थ, माता भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**दैनिक युवक आधार** (RNI NO :- MAHMAR/2023/89514) हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR (RNI NO :- MAHMAR/2023/89514) Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST- RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

## गजानन लीला चॅरिटेबल ट्रस्ट कृतज्ञता पुरस्काराने सन्मानित

दैनिक युवक आधार
पनवेल प्रतिनिधी

: यशवंतराव चव्हाण सेंटर, नवी मुंबई यांच्या वतीने देण्यात येणारा कृतज्ञता पुरस्कार 2025 यावर्षी श्री गजानन लीला चॅरिटेबल ट्रस्ट या संस्थेला देण्यात आला. यावेळी संस्थेचे अ ध्य क्ष बाळासाहेब देशमुख आणि संस्थेचे सचिव जगदीश जाधव उपस्थित होते.




यशवंतराव चव्हाण सेंटर नवी मुंबई केंद्राच्या विद्यमाने शनिवार 22 फेब्रुवारी रोजी नेरूळ येथील स्टर्लिंग महाविद्यालयाच्या सभागृहात झालेल्या कृतज्ञता पुरस्कार सोहळ्यात समाजातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या संस्था आणि व्यक्तींचा शाल, पुष्पगुच्छ आणि सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. या पुरस्कार प्रदान सोहळ्यात अनाथ आणि आदिवासी मुलांच्या सक्षमीकरणाच्या कार्याबद्दल श्री गजानन लीला चॅरिटेबल ट्रस्ट यांचा कृतज्ञता पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. अनाथ आणि आदिवासी मुलांच्या सक्षमीकरणात श्री गजानन लीला चॅरिटेबल ट्रस्टचे महत्त्वाचे योगदान आहे. त्यांच्या या कार्याबद्दल त्यांना पुरस्कार देऊन गौरवण्यात आले. कृतज्ञता पुरस्कार मिळाल्याबद्दल संस्थेचे विविध स्तरातून अभिनंदन आणि कौतुक केले जात आहे.

# वंधत्वाचा सामना करणाऱ्या जोडप्यांचे पालकत्वाचे स्वप्न होणार साकार

## खारघरमध्ये मदरहूड फर्टिलिटी अँड आयव्हीएफ ने नेक्स्ट-जनरेशन फर्टिलिटी ट्रीटमेंट सेंटरचा केला शुभारंभ

दैनिक युवक आधार
खारघर, नवी मुंबई:

हल्लीच्या काळात जोडप्यांमधील सगळ्यात मोठी समस्या म्हणजे वंध्यत्व. प्रदूषण, शहरीकरण, मानसिक ताण, रासायनिक घटकांचे हवेतील वाढते प्रमाण, खाण्या-पिण्याच्या सवयी इ. गोष्टींमुळे हार्मोन्समध्ये (Hormones) बदल होतात आणि त्यामुळे वंध्यत्वाची समस्या उद्‌भवू शकते. अशा जोडप्यांच्या पालकत्वाचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी मदरहूड हॉस्पिटल्सने खारघरमध्ये त्यांचे अत्याधुनिक मदरहूड फर्टिलिटी अँड आयव्हीएफ सेंटर सुरु केले. हे केंद्र प्रजनन उपचारांच्या शोधात असणाऱ्या जोडप्यांना क्लिनिकल तज्ज्ञ, भ्रूणशास्त्रातील आधुनिक तंत्रज्ञान, अत्याधुनिक आयव्हीएफ लॅब आणि सकारात्मक गर्भधारणा साध्य करण्यासाठी जोडप्यांच्या प्रवासाला पाठिंबा देण्यासाठी एक अनुभव टीम उपलब्ध करुन देत आहे. या शुभारंभ प्रसंगी बोलताना, मदरहूड हॉस्पिटल्सचे सीईओ श्री. विजयरत्न वेंकटरमन सांगतात की,अनेक जोडप्यांसाठी वंध्यत्व ही एक गंभीर समस्या ठरत आहे आणि अशा जोडप्यांना उच्च दर्जाच्या प्रजनन उपचारांची आवश्यकता भासत आहे. मदरहूड फर्टिलिटी आणि आयव्हीएफमध्ये, आम्ही जागतिक दर्जाचे प्रजनन उपचार मिळवून देणार आहोत. अनुभवी तज्ज्ञांच्या टीम, अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि रुग्णांना प्राधान्य देणारा दृष्टिकोन यासह नवी मुंबई आणि जवळपसाच्या जोडप्यांना यशस्वी प्रजनन उपचार देण्याचे आमचे मुख्य उद्दिष्ट्य आहे. डॉ. रीटा मोदी(वरिष्ठ आयव्हीएफ सल्लागार, मदरहुड फर्टिलिटी अँड आयव्हीएफ, खारघर) यांनी क्लिनिकल प्रगतीचे महत्त्व अधोरेखित केले आणि म्हटले की, जागतिक आरोग्य संघटनेनुसार, प्रजनन वयोगटातील सर्व जोडप्यांपैकी सुमारे 6 पैकी 1 जोडप्यांना नैसर्गिकरित्या गर्भधारणा करण्यात अडचणी येतात, ज्यामुळे गरजूंसाठी परवडणाऱ्या, उच्च दर्जाच्या प्रजनन उपचारांची उपलब्धता वाढवण्याची गरज आहे. वैज्ञानिक प्रगतीमुळे, आता जोडप्यांना त्यांचे स्वप्न साकार करण्यात मदत करणे शक्य झाले आहे. नवी मुंबईतील खारघर येथील मदरहुड फर्टिलिटी अँड आयव्हीएफच्या शुभारंभप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित नवी मुंबईच्या डीसीपी रश्मी नांदेडकर सांगतात की, कुटुंब सुरू करणे हे प्रत्येकाचे स्वप्न असते, परंतु वंधत्वासारख्या काही आव्हानांमुळे या प्रवासात अनेक अडथळे येतात.या समस्यांना तोंड देणाऱ्या जोडप्यांना योग्य वैद्यकीय सेवा आणि प्रगत उपचारांची उपलब्ध करुन देणे गरजेचे आहे. खारघरमध्ये या आयव्हीएफ केंद्राची सुरुवात हे वंधत्व निवारणाच्या दिशेने एक उत्तम पाऊल ठरत आहे. उपचारांव्यतिरिक्त, जागरूकता पसरवणे आणि प्रजनन समस्यांबद्दलचा कलंक दूर करणे महत्त्वाचे आहे.जोडप्यांना पालकत्वाचे स्वप्न साकार करण्यासाठी मदत करत मदरहुड हॉस्पिटल्सच्या या सकारात्मक उपक्रमाचे मला कौतुक वाटते. खारघर येथील मदरहुड हॉस्पिटल्सच्या फॅसिलिटी डायरेक्टर डॉ. रूपाली सुनील कदम सांगतात की, खारघरचा वेगाने विस्तार होत असून हे आरोग्यसेवेचे केंद्र बनत आहे. प्रजनन उपचारांची दिवसेंदिवस मागणी वाढत असून या नवीन केंद्राच्या माध्यमातूम आम्ही नवी मुंबईतील तसेच आजूबाजूच्या परिसरातील जोडप्यांना उपचारांकरिता इतरत्र धाव घ्यावी लागू नये याकरिता खास सेवा उपलब्ध करुन दिल्या आहेत. परवडणाऱ्या दरात उच्च दर्जाचे प्रजनन उपचार पुरविणे हे आमचे ध्येय्य आहे. मदरहूड हॉस्पिटल्स, महिला आणि बाल आरोग्यसेवेतील त्यांच्या व्यापक कौशल्यासह, आता प्रजनन उपचार पुरवून वंधत्वाने झुंजणाऱ्या जोडप्यांकरिता आशेचा किरण ठरणार आहे. बंगळुरू, इंदूर, गुडगाव, नोएडा, कोइम्बतूर, चंदीगड आणि आता खारघरसह अनेक शहरांमध्ये १२ प्रजनन केंद्रांसह प्रभावी उपचार पुरविले जात आहेत.






## कोप्रोलीच्या तत्कालीन रेशन दुकानदारावर कारवाई कधी?

### प्राधिकार पत्र नसताना रेशनिंग दुकान चालवले कसे?

दैनिक युवक आधार
नवीन पनवेल वार्ताहर

प्राधिकार पत्र नसताना देखील कोप्रोली येथे रेशनिंग दुकान काही वर्षांपासून सुरू होते. नागरिकांनी केलेल्या तक्रारीनंतर हे रेशनिंग दुकान बंद करण्यात आले. आणि बचत गटाला देण्यात आले. मात्र यापूर्वीच्या दुकानदारावर अद्याप देखील गुन्हा दाखल झालेला नाही. याच्या मागे कोणाचा वरदहस्त आहे का असा सवाल या निमित्ताने उपस्थित झाला आहे. यात जे दोषी अधिकारी असतील त्यांच्यावर देखील गुन्हा दाखल करण्याची मागणी केली जात आहे. पनवेल तालुक्यात 199 रेशनिंगची दुकाने आहेत. प्राधिकार पत्र असल्याशिवाय सरकारी रेशनिंग दुकान चालवता येत नाही किंवा इतर ठिकाणी दुकान जोडलेले असल्यास नोकरनामा लागतो. मात्र गेल्या अनेक वर्षांपासून कोप्रोली येथे सुरु असलेले रेशनिंग दुकान विना प्राधिकार पत्र आणि नोकरनामा नसताना देखील सुरू होते. जागृत नागरिकांच्या ही बाब लक्षात आल्यानंतर त्यांनी तत्कालीन पुरवठा अधिकारी कांबळे यांच्याकडे याबाबत तक्रार केली. मात्र याबाबत अद्यापही कोणतीही कार्यवाही झालेली नाही. तत्कालीन पुरवठा अधिकाऱ्यांनी दुकानात भाव फलक नाही, साठा फलक नाही, धान्याचे नमुने ठेवलेले नाही, शेरे बुक-तक्रार बुक नाही यासारखे अकरा मुद्दे उपस्थित केले. मात्र रेशन दुकान चालवण्यासाठी लागणाऱ्या प्राधिकार पत्राबाबत विचारणा केली नाही आणि त्याचा मुद्दा तहसीलदारांना दिलेल्या पत्रात लिहिलेला नाही. त्यामुळे ज्या तत्कालीन पूरवठा अधिकाऱ्याने हे दुकान चालवण्यास परवानगी दिली किंवा त्याकडे दुर्लक्ष केले त्याला वाचवण्याचा प्रयत्न होत असल्याचे बोलले जात आहे. या दुकानावर अर्धवट झालेल्या कारवाईचा मुद्दा नुकत्याच झालेल्या आमसभेत देखील विचारण्यात आला होता. यावेळी तहसीलदार यांच्याकडून कारवाई करण्याचे आश्वासन देण्यात आले. याबाबतची माहिती पुरवठा अधिकारी यांच्याकडे अर्जाद्वारे मागितली असता पूर्वीच्या पुरवठा अधिकाऱ्यांनी जिल्हा पुरवठा कार्यालय येथे पत्रव्यवहार केला असल्याचे लेखी उत्तर देण्यात आले. प्राधिकार पत्र नसताना पूर्वीच्या या दुकानदाराने रेशन दुकान कसे चालवले, याची चौकशी होऊन या दुकानदारावर गुन्हा दाखल करण्याची मागणी नागरिक करत आहेत.

## रुग्णवाहिकेची एर्टिगा गाडीला धडक, एक जण जखमी

दैनिक युवक आधार
**नवीन पनवेल वार्ताहर** : रुग्णवाहिकेने एर्टिगा गाडीला दिलेल्या धडकेत एक जण जखमी झाला आहे. हा अपघात पनवेल शहरातील गार्डन हॉटेल सिग्नल, ठाणा नाकाजवळ झाला. या प्रकरणी रुग्णवाहिका चालक विजय शामराव जगताप यांच्या विरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

रुग्णवाहिका क्रमांक एम एच 05 आर 0924 वरील चालकाने त्याच्या ताब्यातील वाहन रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करून भरधाव वेगाने चालवले आणि एर्टिगा क्रमांक एम एच ०३ सीएम 5603 या गाडीला 22 फेब्रुवारी रोजी रात्री दहाच्या सुमारास पनवेल येथील गार्डन हॉटेल सिग्नल, ठाणा नाका या ठिकाणी मागून येऊन धडक दिली. यावेळी मंगेश गोविंद कांबळे (राहणार मुंबई विद्याविहार) यांना किरकोळ दुखापत झाली आहे. त्यानंतर अपघाताची माहिती पोलिसांना न देता चालक पळून गेला आहे. या अपघातात दोन्ही वाहनांचे नुकसान झाले आहे. या प्रकरणी विजय जगताप (राहणार डोंबिवली ईस्ट) यांच्या विरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात 23 फेब्रुवारी रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.




## कामोठे पोलिसांनी चोरीतील केली 3 वाहने केली हस्तगत ; तीन आरोपी गजाआड

दैनिक युवक आधार
पनवेल, वार्ताहर

कामोठे परिसरात चोरी झालेल्या चार चाकी वाहनांपैकी 6 वाहने हस्तत करण्यात आली असून या प्रकरणी तीन जणांना गजाआड करण्यात पोलिसांना यश आले आहे. कामोठे पोलीस ठाण्याच्या हद्दीत वाहन चोरी संदर्भातील गुन्हे दाखल होताच वपोनि विमल बिडवे यांचे मार्गदर्शनाखाली कामोठे पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकातील पो.उप.नि किरण राऊत, पो. हवा संजय झोळ, पो.ना सचिन ठोंबरे, पो.शि प्रमोद कोकाटे, नितीन गायकवाड आदींनी तांत्रिक तपास व गुप्त बातमीदाराद्वारे आरोपींची माहिती काढून त्यामध्ये मोहम्मद शाहिद मिर्झा बेग, वय -41, मोहम्मद फैज अकबर शेख, वय -48, अजीज रशीद खान, वय -48 यांना ताब्यात घेवून त्यांच्याकडून गुन्ह्यातील दोन स्वीफ्ट व एक इर्टीगा ताब्यात घेण्यात आली असून सहा गुन्हे उघडकीस आणले आहेत. सदर आरोपी हे सराईत असून त्यांच्यावर कामोठे, बोरीवली, वागळे पोलीस ठाणे आदी ठिकाणी वाहन चोरीचे गुन्हे दाखल आहेत. यांच्या अटकेमुळे अजूनही वाहन चोरीचे गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.



## शिवसेना उरण विधान सभा पनवेल तालुका प्रमुख पदी रघुनाथ मंगळ पाटील यांची नियुक्ती

दैनिक युवक आधार
पनवेल,(वार्ताहर)

शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या आशीर्वादाने तसेच शिवसेना मुख्य नेते एकनाथ शिंदे राज्य उपमुख्यमंत्री यांच्या आदेशाने तसेच मावळ खासदार आप्पा बारणे यांच्या आदेशाने व संजय मोरे व रायगड जिल्हा प्रमुख संतोष भोईर यांच्या मार्गदर्शन नुसार उरण विधान सभा पनवेल तालुका प्रमुख पदी रघुनाथ मंगळ पाटील यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या संदर्भात झाल्याबद्दल अभिनंदन रायगड जिल्हाप्रमुख संतोष भोईर यांनी रघुनाथ पाटील यांना नियुक्तीपत्र देवून पुढील राजकीय वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

फोटो : रघुनाथ पाटील नियुक्ती



# हजरत सय्यद अमीर शहाबाबा यांच्या नामाचा उल्लेख हाबीर शहा केल्याने मुस्लिम समाजाचा आक्रोश

## आम्हाला जागेची मालकी नको दर्गे ची सेवा करण्याची गावकी हवी...मनसुर पटेल

दैनिक युवक आधार
पनवेल ओवे: - पनवेल ओवे येथील मुस्लिम समाजाचे श्रद्धेय स्थान असलेले हजरत सय्यद अमीर शहाबाबा दर्गा स्थळ 300 वर्षांपासून अस्तित्वात आहे .वक्फ दफ्तरी हजरत सय्यद अमीर शहाबाबा यांच्या नामाचा उल्लेख हाबीर शहा केल्याची माहिती समजताच ओवे येथील बाबांच्या अनुयायी व मुस्लिम समाजानी यावर आक्रोश, नाराजी व्यक्त केली. वर्ष २०१६ पासून ओवे ग्रामस्थ व सध्या स्वतःला ट्रस्टी म्हणणारे हाजी मुस्ताक पटेल ,असिफ पटेल व अतिक पटेल अन्य त्यांच्याच पटेल कुटुंबियांचा दर्गे वरील ताबा व वाढता दबाव ,वादविवाद अंकुश पाहता अनेक विषयांना वाचा फुटली आहे . त्या संघर्षात बाबांचे अनेक वर्षे सेवा करणारे अल्पसंख्याक समाजाचे नेते ग्रामस्थ मनसुर पटेल यांनी गाववाल्यांच्या



सहमतीने नव्याने केलेल्या दर्गा नोंदणी प्रक्रियेच्या कागदपत्रांची पाहणी केली असता त्यात अनेक आक्षेपार्ह नोंदी निर्देशनात आल्या असल्याचे पुरावे सादर केले . संतांचे नाव बदलणे, दर्गेचे सर्व्हे नंबर वेगळे दाखवणे ,स्थानिक ग्रामस्थ दर्गा कारभारी शिष्टमंडळाला विश्वासात न घेता वक्फ च्या कार्यालया तर्फे कागदोपत्री पंचनामा तयार करण्यात आले. त्यात काही पंच साक्षीदारांच्या आक्षेपार्ह स्वाक्षरी असल्याचे आढळल्याने संपूर्ण गाव संताप व्यक्त करण्यासाठी एकवटला गेला होता,त्या बाबतीत काही पुरावे ही दाखवण्यात आले . अश्या एक न अनेक मुद्द्यांवर चर्चा व्हावी म्हणून दि.२३ फेब्रुवारी रोजी संतप्त ग्रामस्थांनी दर्गा परिसरात सामूहिक गाव बैठक घेऊन सविस्तर चर्चा केली.त्यात वक्फ व प्रशासकीय दप्तरी स्वयंघोषित ट्रस्टी सांगणाऱ्या नोंदी तात्काळ रद्द करण्यात याव्या व नव्याने ओवे ग्रामस्थांना विश्वासात घेऊन ट्रस्ट बनवावी अशी प्रमुख मागणी एकमताने करण्यात आली. तसेच सदर दर्गा ट्रस्टच्या मालकी व जवाबदारी संबंधितच्या संशयित कागदपत्रांची तातडीने चौकशी व्हावी यासाठी नवी मुंबई पोलीस आयुक्त, अल्पसंख्याक आयोगा कडे मागणी करण्यात आली असल्याचे सांगितले. या बाबतीत दूरध्वनी द्वारे माध्यमांनी माहिती ट्रस्टी कडे विचारली असता हे सर्व आरोप खोडीत असिफ पटेल यांनी विरोधकांनी कोर्टात आरोप सिद्ध करावे अशी प्रतिक्रिया दिली. मनसूर पटेल यांनी मुस्ताक,अतिक,असिफ पटेल यांच्या गैरकारभारविरुद्ध पुरावे सादर करत पर्दाफाश करताना अनुयायांच्या श्रद्धेय अस्थेशी सुफी संतांच्या गरिमेला कोणीही गाळबोट लावण्याचा प्रयत्न केलेंला कदापी सहन केला जाणार नाही असे सांगितले. यावेळी मन्सूर पाटील ,मुख्तार पटेल, मुदसिर पटेल, एजाज पटेल, साजिद पटेल ,खालीद पटेल, सुभान पटेल, शोएब पटेल, फहीम पटेल ,इम्रान पटेल
आशपाक खमसे,पापा पटेल व अन्य ग्रामस्थ ज्येष्ठ श्रेष्ठ कारभारी मंडळ मोठया संख्येने उपस्थित होते.

# सोमटणे ग्रामपंचायत हद्दीत बेकायदेशीर लाकडी गोडाऊनला आग

### रस्त्या लगतच्या प्यालेट गोडाऊन अतिक्रमणांवर पिडब्लूडी खात्या कडून कारवाई व्हावी ..मनसे संजय तन्ना

दैनिक युवक आधार
**पनवेल /सोमटने :-** सोमटणे ग्रामपंचायत हद्दीत बेकायदेशीर व असुरक्षित अव्यवस्थापनात अनेक छोटी मोठी गोडाऊन रस्त्या लगतच बिनदास पणे ताठ मांडून सुरक्षिततेचे नियम न पाळता व्यवसाय करत आहेत ,त्यात लाकडी गोडाऊन मोठ्या प्रमाणात असून त्यात अनेक कामगार असुरक्षित पणे काम करत असतात .उघड्या जागेवर गोडाऊन व्यवसाय करण्याची परवानगी नसताना ही सार्वजनिक बांधकाम खात्याच्या दुर्लक्षामुळे अनेक वेळा अचानकपणे आग लागून मोठ्या स्वरूपाची दुर्घटना होत असतात, त्याचंच प्रत्येय दि.२४ फेब्रुवारी रोजी अपोलो गोडाऊन जवळ आज घडला रस्त्या लगत असलेले बांबू व प्लास्टिक पॅलेट असलेले गोडाऊन आगीच्या आटोक्यात सापडल्याने मोठी जीवित हानी होता होता थांबली . त्या आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी भाजपचे नेते आत्माराम पाटील यांनी पोलीस व अग्निशामक केंद्र येथे संपर्क साधले.त्या ठिकाणी पनवेल तालुका पोलीस नाईक नितीन डगळे व पोलीस शिपाई सुनील खैरनार यांनी नवकार लॉजस्टिक येथील अग्निशामक दलाच्या व स्थानिक कामगार व नागिरीकांच्या मदतीने 3 तास कठोर मेहनत घेत आगीवर



नियंत्रण मिळवले. कोकण रेल्वे मार्गाला म्हणजे सोमटने रेल्वे लाईनला व जिल्हा परिषद शाळेला लागून आगीचा भडका उठल्याने मोठी जीवित हानी रोखण्यात यश प्राप्त झाले . पत्रकार साबीर शेख व सोमटने ग्रामपंचायतिच्या वतीने अश्या आपत्कालीन भयंकर परिस्थिती बाबतींत सार्वजनिक बांधकाम विभागाने रस्त्या जवळील अतिक्रमणांवर व बेकायदेशीर अडथळे करणाऱ्या व्यवसायिकांवर कारवाई व्हावी यासाठी दूरध्वनीद्वारे पिडब्लूडी विभागा कडे मागणी करण्यात आली . जमिनी पासून अगदी कमी अंतराच्या उच्च विद्यत दाबाच्या विद्युत वाहिनी खाली प्लास्टिक व लाकडी प्यालेट व्यवसाय मांडणाऱ्या आलम नावाच्या व्यवसायिकांच्या गोडाऊनला या पूर्वी ही अशी भयंकर मोठी आग लागल्याने अश्या व्यवसायिकांवर कायद्याचा अंकुश रहावा व कठोर शासन व्हावे अशी मागणी जोर धरत आहे .

## छत्रपती शिवाजी महाराज हायस्कूल रोहिंजण येथील विद्यार्थ्यांसाठी तातडीने अंडरपास कार्यान्वित करावा ; पाण्याचा प्रश्न सोडवावा

### शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाची महानगरपालिकेकडे मागणी

दैनिक युवक आधार
पनवेल, (वार्ताहर)

पनवेल तालुक्यातील छत्रपती शिवाजी महाराज हायस्कूल रोहिंजण येथील विद्यार्थ्यांसाठी तातडीने अंडरपास कार्यान्वित करावा त्याचप्रमाणे तेथील भीषण पाणी टंचाईचा प्रश्न सोडवावा या मागणीसाठी आज शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी पनवेल महापालिकेचे आयुक्त मंगेश चितळे यांची भेट घेवून त्यांच्याकडे निवेदन सादर केले आहे. आज शिवसेना जिल्हाप्रमुख रायगड-पनवेल शिरीष घरत यांनी पनवेल महानगरपालिका आयुक्त मंगेश चितळे यांची भेट घेतली. यावेळी पनवेल महानगर क्षेत्रातील विविध मुद्द्यांवर चर्चा करण्यात आली. ज्यामध्ये रोहिंजण नाका येथे लाइटचा हाय-मास उभारण्यात यावा तसेच छत्रपती शिवाजी महाराज हायस्कूल रोहिंजण या शाळेमध्ये 1200 विद्यार्थी शाळा शिकत आहेत. येथील मुख्य रस्त्यावर पनवेल-मुंब्रा रोडवर रस्ता क्रॉसिंग करताना अपघात होण्याच्या शक्यता निर्माण होत आहेत याकरिता, रोहिंजण नाका येथे असणारा अंडरपास कार्यान्वयीत करावा तसेच छत्रपती शिवाजी महाराज हायस्कूल रोहिंजण ला पाण्याची भीषण टंचाईला सामोरे जावे लागत आहे. त्याकरिता पाण्याच्या टँकरची व्यवस्था करून मिळावी. घोट गाव येथेल स. नं. 29/1 व 29/3 मधील भातशेती व बागायतीच्या लगत कॉन्क्रीट प्लांट मुळे खूप नुकसान होत आहे, ग्राम विकास महसूल अधिकारी सजा पेंधर यांनी स्थानिक चौकशी व पंचनामा केला आहे तरीही आजतागायत कोणत्याही प्रकारची कारवाई करण्यात आली नाही सदर बाब महानगर पालिके तर्फे किंवा संबंधित कार्यालया मार्फत योग्य ती कारवाई करण्याची मागणी यावेळी करण्यात आली. याप्रसंगी शिवसेना उपजिल्हा प्रमुख भरत पाटील, महानगर समन्वयक दिपक घरत, महानगर प्रमुख अवचित राऊत, उपमहानगर संघटक सुनीत पाटील, पनवेल शहर प्रमुख प्रवीण जाधव, सुनील पाटील, भगवान महाराज उपस्थित होते.




फोटो : आयुक्त मंगेश चितळे यांना निवेदन देताना

# खिर्डी येथे शिवजयंती उत्साहात साजरी

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी किशोर गुडेकर**

मुंबई खिर्डी बु ता.रावेर येथे शिवप्रेमी तरुण मित्रांच्या ग्रुप तर्फे छत्रपती शिवाजी महाराज जयंती चे आयोजन करण्यात आले होते. सरपंच उपसरपंच ग्रामपंचायत सदस्य पोलीस पाटील व गावातील प्रमुख मान्यवराच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज व भारत माता यांच्या प्रतिमेचे व छ.शिवाजी महाराज भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मुर्ती चे पुजन करण्यात आले. सायंकाळी सर्व शक्ती सेना प्रमुख प्रा. संजय मोरे ,प्रगतशील शेतकरी भास्कर पाटील हस्ते पुजन करण्यात आले. त्या प्रसंगी प्रा. संजय मोरे यांनी आपले मनोगत व्यक्त करतांना सांगीतले कि, सर्व जाती धर्मातीलमावळ्यांना सामान न्याय देत सामाजिक क्रांतीचा पाया रचणारे जाती धर्माच्या भिंती भेदुन, माणसाला माणुसकीने जगायला शिकविणारे, राज्य म्हणजे, शिवरायांचे स्वराज्य तर अखंड हिंदुस्थानाचे (भारताचे) आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज होते. आपल्या आईला जिजाऊ माँ सांहेबाना सती, जाण्यापासुन रोखणारे छत्रपती शिवाजी महाराज " सामाजिक क्रांती " करणारे होते. मुहूर्थ न पाहता अशुभ मानल्या गेलेल्या, अमावसेच्या रात्री लढायां करून त्या सर्वच्या सर्व लढायां जिकणारे, "अंधश्रद्धा निर्मूलणचा, संदेश देणारे चिकित्सक शिवबा राजे होते.समुद्र प्रवास करण्यास हिंदु धर्मात बंदी होती. तो विरोध पत्करून आरमार उभे करून आधुनिक नौदलाचा पाया रचुन धर्मापेक्षा देश मोठा आहे. हा संदेश देणारे स्व – धर्मचिकिस्क राजे होते. पर स्त्रि मातेसमान मानत महिलांना सन्मानाने वागवणारे " मातृभक्त , नारी रक्षक " छत्रपती शिवराय. 350 वर्षापुर्वी महाराजानी सुरु केलेली शिवकालिण पाणी साठवण व्यवस्था आजही तितकी प्रभावी आहे. 350 वर्षा पुर्वी कोणतेही दळणवळणाची साधने नसताना अभेध्य असे 100 राहुन अधिक गडकिल्याचे निर्माते छत्रपती शिवाजी महाराज होते.खऱ्या अर्थाने ते लोकराजे होते. त्यानी धर्म व जातीच्या पलीकडे जाऊन सुखी जनतेचे स्वन पहात होते. हिच खरी त्याची शिवशाही होती.आजच्या युवकाने छत्रपती शिवाजी महाराज्याचे लीडरर्शीफ, व्यवस्थापन, आत्मविश्वास, टीमवर्क, दूरदृष्टी, टाइम् मॅनेजमेंट, योग्य सहकार्याची निवड, दीर्घ कालीन विचार, शांततेचे निर्णय, छोटयात छोटी सुरुवात असे गुण आजच्या युवकांनी अंगीकारले पाहिजे. तरच त्याचे व आपल्या राज्याचे व देशाचे कल्याण होईल असे सर्व शक्ती सेना महाराष्ट्र राज्य अध्यक्ष तथा भाजपा अनुजाती मोर्चा राज्य सचिव प्रा. संजय मोरे यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सांगीतले. कार्यक्रमाला प्रगतशील शेतकरी भास्कर वामन पाटील उपसरपंच धीरज पाटील डॉ. धनराज बावस्कर डॉ. संदीप गाढे ऍड. मोहन कोचुरे ,निळकंठ पाटील युवा पत्रकार संकेत पाटील, ग्रा.प.सदस्य गणेश देवगिरीकर , डॉ.धनराज बावसकर ,मपसेचे अध्यक्ष सुरेश बोदवडे, शुभम महाले, शुभम जाधव राकेश रायपुरे दिवाकर मालखेडे राहुल तेली रोहित सोनवणे उमेश तायडे राज कोचुरे ईश्वर ससाणे नितीन कोळी भावेश पाटील निखिल रायपूरे प्रफुल शिरनामे कृष्णा चौधरी , गुणवंत ढाके यांसह कार्यकर्ते उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुरेश बोदवडे यांनी केले तर आभार पोलीस पाटील रितेश चौधरी यांनी मानले.




# बेकायदा बांधकाम दिव्यातील कारवाई तूर्तास थांबवा – वनमंत्री गणेश नाईक

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे रेवदंडा**

दिव्यातील ५४ इमारतींबाबत मंगळवारी मंत्रिमंडळ बैठकीत चर्चा करण्यात येईल, तोपर्यंत ही कारवाई तूर्तास थांबवा , असे आदेश वनमंत्री गणेश नाईक यांनी ठाणे महापालिका अधिकाऱ्यांना यावेळी दिले.कल्याण – डोंबिवली शहरातील बेकायदा इमारतीमधील रहिवाशांची फसवणूक झाली असून न्यायालयाच्या निर्णयाचा सन्मान , आदर ठेवून येथील नागरिकांना न्याय कसा देता येईल याचा विचार केला जाईल, असे मत वनमंत्री गणेश नाईक यांनी सोमवारी ठाणे जनता दरबारात व्यक्त केले. तसेच दिव्यातील ५४ इमारतींबाबत मंगळवारी मंत्रिमंडळ बैठकीत चर्चा करण्यात येईल, तोपर्यंत ही कारवाई तूर्तास थांबवा , असे आदेश त्यांनी यावेळी ठाणे महानगरपालिकेला दिले आहे.ठाणे येथील खारकर आळी भागातील रघुवंशी हॉल मध्ये सोमवारी वनमंत्री गणेश




नाईक यांनी जनता दरबार घेतला. यावेळी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे पदाधिकारी दिपेश म्हात्रे यांच्यासह नागरिकांनी नाईक यांना निवेदन देऊन कल्याण–डोंबिवली शहरातील बेकायदा इमारतीमधील रहिवाशांना न्याय देण्याची मागणी केली. त्यावर वनमंत्री गणेश नाईक यांनी दिपेश म्हात्रे आणि नागरिकांसोबत चर्चा करून त्यांच्याशी संवाद साधला. कल्याण–डोंबिवली शहरात अनेकांनी इमारतीत घरे घेतली. घर खरेदीसाठी बँकांनी कर्ज दिले. आता या इमारती बेकायदा असल्याचे निष्पन्न झाले असून येथील नागरिकांची फसवणूक झाली आहे. त्यात त्यांची काहीच चूक नाही. येथील नागरिकांनी त्यांचे म्हणणे ऐकून घेण्यासाठी आणि कागदपत्र जमा करण्यासाठी वेळ मागितला आहे. तसेच माजी मंत्री रविंद्र चव्हाण यांनीही नामदार गणेश नाईक यांना फोन करून सांगितले की, त्यांच्या भागातही अशाच सात ते आठ इमारती आहेत. तसेच कल्याण ग्रामीणमध्येही अशा अनेक इमारती आहेत, असे वनमंत्री गणेश नाईक म्हणाले. कल्याण – डोंबिवली शहरातील बेकायदा इमारतीमधील रहिवाशांची फसवणूक झाली असून याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासोबत मंगळवारी होणाऱ्या मंत्रिमंडळच्या बैठकीत चर्चा करण्यात येईल. तसेच न्यायालयाच्या निर्णयाचा सन्मान ठेवून येथील नागरिकांना न्याय कसा देता येईल याचा विचार केला जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले दरम्यान , दिवा भागातील ५४ बेकायदा इमारतींवर न्यायालयाने कारवाईचे आदेश दिले असून पालिकेने या इमारतींवर कारवाई करण्याची तयारी सुरू केली आहे. येथील नागरिकांच्या शिष्टमंडळाने गणेश नाईक यांची भेट घेऊन कारवाई थांबविण्याची मागणी केली. त्यावर दिव्यातील ५४ इमारतींबाबत मंगळवारी मंत्रिमंडळ बैठकीत चर्चा करण्यात येईल, तोपर्यंत ही कारवाई तूर्तास थांबवा , असे आदेश त्यांनी ठाणे महापालिका अधिकाऱ्यांना यावेळी दिले. कल्याण मधील ६५ इमारतीच्या बाबतीत आम्ही जनता दरबारात न्याय मागितला आहे, आम्हाला वनमंत्री गणेश नाईक यांनी आश्वस्त केले आहे की, येथील रहिवाशी यांच्यावर कोणत्याही स्वरूपात अन्याय होऊ देणार नाही. शासनाने आता न्यायालयात रहिवाशांसाठी रिट याचिका दाखल करावी आणि येथील जनतेला न्याय द्यावा, असे शिवसेना (उबाठा) पक्षाचे पदाधिकारी दिपेश म्हात्रे यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले.

# संधिवात व हाडांची मोफत तपासणी शिबिर संपन्न ; 148 रुग्णांनी घेतला लाभ

## ए के अँड सन्स मेडिकलचे प्रवीण जैन यांची संकल्पना

**दैनिक युवक आधार**
**नागोठणे : वार्ताहर**

ए के अँड सन्स मेडिकलचे मनोज जैन व प्रवीण जैन व रोहा येथील भट नर्सिंग होमचे अस्थिरोग तज्ञ डॉ. अभिषेक रापते यांच्या संयुक्त विद्यमाने शहरात प्रथमच मोफत संधिवात व हाडांच्या ठिसूळपणाची मोफत तपासणी शिबिर रविवार 23 फेब्रुवारी रोजी छत्रपती शिवाजी महाराज बाजार पेठेतील गिरीराज पॉलिक्लिनिक येथे सकाळी 09 ते सायं. 06.30 या वेळेत संपन्न झाला. या शिबिराचा 148 रुग्णांनी लाभ घेतला असून यावेळी गरजवंतांना मोफत औषधेही देण्यात आल्याची माहिती प्रवीण जैन यांनी दिली. सकाळी 09..00 वाजता चालू झालेल्या सदरील शिबिराला शहर व विभागातून मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळाल्याने दुपारी 2.00 पर्यन्त असलेले शिबीर सायं. 06.30 वाजेपर्यंत चालले. या शिबिरात अस्थिरोग तज्ञ डॉ. अभिषेक रापते यांनी सर्व रुग्णांची समस्या ऐकून घेत व्यवस्थित तपासणी करुन त्यांच्या प्रत्येक शंकांचे निरसन केले. या शिबिराचा 148 रुग्णांनी लाभ घेतला. यावेळी शहर व परिसरातील नागरिकांना संधिवात व हाडांच्या असलेल्या आजारांवर योग्य मार्गदर्शन व्हावे या संकल्पनेतून सदरील शिबीर घेण्यात आल्याची माहिती ए के अँड सन्स मेडिकलचे प्रवीण जैन यांनी देऊन सदरील शिबिराला अल्प कालावधीत चांगला प्रतिसाद दिल्याबद्दल सर्व रुग्ण व सहकार्यांना धन्यवाद देत असल्याचे सांगितले. सदरील शिबिर यशस्वी करण्याकरीता प्रवीण जैन व मनोज जैन यांच्या मार्गदर्शनाखाली तनुजा दळवी, दिव्या नाकते, दिशा जाधव, राहुल मानकर, रविराज चिकणे, सुचिता डोलकर, दीक्षा जगताप यांचे विशेष मेहनत घेतली.



# निफाड इंग्लिश स्कूल मध्ये भरली माजी विद्यार्थ्यांची शाळा

**दैनिक युवक आधार**
**उत्तर महाराष्ट्र विभागीय संपादक**
**विनोद गायकवाड.**

निफाड इंग्लिश स्कूल विद्यालयात माजी विद्यार्थ्यांचे गेट–टुगेदर उत्साहात निफाड येथील निफाड इंग्लिश स्कूल विद्यालय इत्या दहावी सन २०१० च्या बॅचच्या माजी विद्यार्थी विद्यार्थिनी पुन्हा एकत्र येऊन जुन्या आठवणींना उजाळा दिलाअसून तब्बल पंधरा वर्षानंतर माजी विद्यार्थ्यांचा गेट–टुगेदर पार पडला, कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रगीत गाऊन व कवायत करून झाला. यावेळी जुन्या आठवणींना उजाळा देताना अनेकांना गहिवरून आले होते, १५ वर्षपूर्वी शाळेत असताना अगदी लहान असणाऱ्या मुलांनी आज आपल्या क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करून आपली ओळख निर्माण केल्याचे पाहून शिक्षकांना देखील विद्यार्थ्यांचा अभिमान वाटला. यावेळी अनेक विद्यार्थ्यांनी आपल्या अनेक आठवणी सर्वांसमोर व्यक्त केल्या, या स्नेह मेळाव्याला शिक्षक राजेंद्र सोमवंशी, अविनाश गांगोडे, राजेंद्र गांगोडे, तुषार कराड, पुंड सर, कोळी सर, मासरे सर ,टी बी आहेर उपस्थित होते. या दरम्यान माजी विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले, तसेच माजी विद्यार्थ्यांतर्फे सर्व शिक्षकांना शाल व श्रीफळ देऊन सत्कार केला, नेहमीप्रमाणे सोमवंशी सरांनी कविता वाचून परत एकदा सर्व माजी विद्यार्थ्यांना मंत्रमुग्ध केले व नंतर भोजनाचा आस्वाद घेतला. या स्नेह मेळाव्यासाठी माजी विद्यार्थी व विद्यार्थिनी कल्याणी वडघुले,विजय केदार ,सौरभ वडघुले ,भरत निकम,सोमनाथ ताडगे,अमित वडघुले ,विकी खडताळे ,राजेंद्र निकाळजे ,गौरव कर्डीले ,तुषार गवारे,अश्विनी गाजरे ,सोनाली सांगळे,ज्योती शिंदे,गायत्री भवर ,कुणाल साळवे ,वैभव संगमनेर,इ. विद्यार्थी उपस्थीत होते.




# पनवेलमध्ये घरकुल मंजुरी पत्र वाटप!

## आवास योजनेच्या दुसऱ्या टप्प्यात २३७ लाभार्थी आ. प्रशांत ठाकूर यांच्या उपस्थितीत कार्यक्रम संपन्न

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**



पंतप्रधान आवास योजनेच्या ग्रामीण टप्पा–२ मध्ये राज्यातील २० लाख लाभार्थ्यांना मंजुरीचे पत्र, तर १० लाख लाभार्थ्यांना घरकुलासाठी प्रथम हप्ता वितरण करण्यात आला. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम पुण्यातील बालेवाडीतील शिवछत्रपती क्रीडा संकुलात पार पडला. दरम्यान, पनवेल पंचायत समितीच्या कार्यालयात ऑनलाइन पद्धतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी २३७ लाभार्थ्यांना याचा लाभ देण्यात आला. आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रतिनिधिक स्वरूपामध्ये मंजुरी पत्र वाटप करण्यात आले. अन्न वस्त्र निवारा या मानवी गरजा आहेत. देशाला स्वातंत्र्य मिळून पाऊणशे वर्षे झाली तरी अद्यापही अनेकांना या मूलभूत गरजा मिळालेल्या नाहीत. लाखो कुटुंब भाडेतत्त्वावर घर घेऊन राहतात. तर अनेकांना सार्वजनिक ठिकाणी उघड्यावर वास्तव्य करावे लागते. प्रत्येकाला आपल्या स्वतःचे घर मिळावे त्यांच्या मूलभूत गरजा पूर्ण व्हाव्यात यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पुढाकार घेतला. त्यानुसार पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकातील कुटुंबांना घर देण्याचे धोरण केंद्र व राज्य सरकारने आखले आहे. त्यानुसार गेल्या दहा वर्षांमध्ये मोठ्या प्रमाणात घरे बांधून ते गरीब गरजूंना देण्यात आले आहेत. शनिवारी पंतप्रधान आवास योजना टप्पा दोन मधील २० लाख लाभार्थ्यांना मंजुरी पत्र वाटप करण्यात आले. त्यापैकी दहा लाख जणांना पहिला हप्ता देण्यात आला. देशाचे गृहमंत्री अमित शहा यांच्या प्रमुख उपस्थितीत बालेवाडी या ठिकाणी कार्यक्रम संपन्न झाला. त्याचबरोबर प्रत्येक तालुक्यामध्ये तसेच गावागावात लाभार्थ्यांना मंजुरी पत्र आणि पहिल्या हप्त्याचे वाटप करण्यात आले. पनवेल तालुका पंचायत समितीच्या सभागृहात आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रम संपन्न झाला.यावेळी विधान परिषदेचे आमदार विक्रांत पाटील पाटील, भाजप जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, गटविकास अधिकारी समित वाठारकर, वन अधिकारी एम.डी. राठोड, विस्तार अधिकारी सांख्यिकी संतोष ठोंबरे यांच्यासह पदाधिकारी लाभार्थी उपस्थित होते.

# करंजगाव येथे महाशिवरात्री निमित्ताने सिद्धेश्वर महादेव मंदिरात भव्य अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन

**दैनिक युवक आधार**
**निफाड राहुल कुलकर्णी**

निफाड तालुक्यातील करंजगाव येथे गोदातीरी वसलेल्या प्रभू श्री रामचंद्रांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या भूमीमध्ये व सिद्धेश्वराचे सिद्धस्थान असलेल्या सिद्धेश्वर महादेव मंदिरात.... महंत श्री विठ्ठलनाथ जी महाराज व ह. भ .प .गोविंद महाराज लोणजाई यांच्या शुभ प्रेरणेने व ह. भ .प.गुलाब महाराज खालकर आर्वी यांच्या कुशल मार्गदर्शनाने व समस्त ग्रामस्थ करंजगाव यांच्या सहकार्याने सालाबाद प्रमाणे याही वर्षी अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे . तरी या परमार्थिक संधीचा समस्त ग्रामस्थ व पंचक्रोशीतील सर्व भाविक लाभ घेत आहेत. तरीही इतर भाविक भक्तांनी लाभ घेण्याचे आवाहन करंजगाव येथील समस्त भजनी मंडळ व सिद्धेश्वर महादेव मंदिर भक्त परिवाराने केले आहे. या कार्यक्रमासाठी महाराष्ट्रातील प्रसिद्ध असे



कीर्तनकार माधव महाराज चव्हाण बेरवाडी, प्रसाद महाराज शेळके लासलगाव, ऋषिकेश महाराज कुयटे धानोरे , सौरभ महाराज जाधव कुंडाणेकर योगेश महाराज जाधव कान्हेरवाडी , निवृत्ती महाराज रायते खडक माळेगाव , गोरक्षनाथ माऊली जाधव शहा कारवाडी , मुरकुटे महाराज माऊली आळंदी यांचे दररोज रात्री ९ ते ११ या वेळेत हरी किर्तन संपन्न होत आहे.ज्ञानेश्वर माऊली शिंदे रुई आश्रम यांचे गुरुवार दिनांक २७/ २/२०२५ रोजी काल्यांचे कीर्तन सकाळी दहा ते बारा वाजेपर्यंत आयोजित केलेले असून समस्त करंजगाव ग्रामस्थ यांच्या वतीने गुरुवार रोजी महाप्रसादाच्या कार्यक्रमाचे आयोजन या ठिकाणी करण्यात आलेले आहे. तरी पंचक्रोशीतील सर्व भाविकांनी याचा लाभ घेण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे. याप्रसंगी गायक भजनसम्राट अंबादास महाराज टेकाळे, केसापूर हिंगोली संगीतकार सिद्धेश्वर महाराज हुसे सिंदखेडराजा गोविंदा अण्णा राजोळे , सुरेश नामदेव राजोळे, भाऊसाहेब टिळे, कारभारी पोटे गायत्री खाडे ,प्रगती कोटकर, गायक असून मृदुंगाचार्य म्हणून पार्थ महाराज रायते, अथर्व महाराज पडोळ ,शंकर महाराज लोखंडे ,तुषार महाराज डेर्ले जनार्दन राजोळे, रोहित महाराज मुळे हे असून विणेकरी सूर्यभान महाराज पवार एकनाथ महाराज भगुरे काकड आरतीसाठी कचरू महाराज पिंगळे आहुर्ली, केशव महाराज महाले वांजुळी, शंकर महाराज गवारे इगतपुरी. पहारेकरी शिवनाथ रुद्रवंशी, रामेश्वर पावशे, निंबाजी टिळे, शिवाजी कोटकर, कैलास कोटकर, सोमनाथ टिळे , विष्णू पगार ,मधुकर ढेपले भालदार चोपदार गणपत रामभाऊ राजोळे , अर्जुन जगन्नाथ भगुरे असून करंजगाव ,चापडगाव ,भुसे, भेंडाळी, माळसाकोरे, गाजरवाडी,शिवरे ,शिंगवे ,कोठुरे, मांजरगाव ,सोनगाव ,सुंदरपूर, काथरगाव, सायखेडा ,औरंगपूर, चांदोरी ,भाऊसाहेब नगर रामनगर, महाजनपूर ,बेरवाडी व गोदाकाट परिसरातील भजनी मंडळ उपस्थित राहत आहे यावेळी समर्थ मंडप डेकोरेशन अँड साऊंड सिस्टिम करंजगाव तसेच सप्तशृंगी माता फुलहार सेवा करंजगाव यांचेकडून विशेष सहकार्य होत आहे.

# प्रधानमंत्री आवासयोजना ग्रामीण टप्पा २ अंतर्गत नांदेड जिल्ह्यातील १ लक्ष २० हजार लाभार्थींना पाहिला हप्ता वितरण

**दैनिक युवक आधार**
**नांदेड प्रतिनिधी**
**चंद्रशेखर वाघमारे पपु निवळीकर**

नांदेड येथील कार्यक्रमात खासदार डॉ. अजित गोपछडे यांच्या हस्ते घरकुल मंजुरी प्रमाणपत्र वाटप बालेवाडी, पुणे येथील राज्यस्तरीय कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण घरकुलांचे बांधकाम गतीने होण्यासाठी प्रयत्न करणार नांदेड मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत पुणे येथील बालेवाडीतील प्रधानमंत्री आवास योजना कार्यक्रम आज नांदेडच्या शेकडो लाभार्थ्यांनी नांदेड वरून दृकश्राव्य माध्यमातून बघितला. नांदेड जिल्ह्यातील १लक्ष २० हजार लाभार्थ्यांना आज पहिला हप्ता देण्यात आला. खासदार डॉ. अजित गोपछडे, मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल विभागीय संगठन मंत्री संजय कौडगे डॉ सचिन पाटील उमरेकर आदींची यावेळी उपस्थिती होती. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, ग्राम विकास व पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे, यांच्या प्रमुख उपस्थितीत पुणे बालेवाडी येथे आयोजित कार्यक्रमात दूरदृश्य प्रणालीद्वारे राज्यातील प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण टप्पा २ मधील २० लक्ष लाभार्थ्यांना मंजुरी पत्र आणि १० लक्ष लाभार्थ्यांना पहिला हप्ता वितरण करण्यात आले. यानिमित्ताने नांदेड येथे जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भावनात जिल्हाभरातील लाभार्थी एकत्रित आले होते. नांदेड जिल्ह्यामध्ये प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण टप्पा दोन अंतर्गत एकूण एक लक्ष एकोणपन्नास हजार लाभार्थी मंजूर आहेत. त्यापैकी आज १लक्ष २० हजार लाभार्थ्यांना १५ हजारचा पहिला टप्पा बहाल करण्यात आला. त्यांच्या खात्यात थेट हा पैसा जमा झाला. यावेळी अनेक लाभार्थ्यांनी शासनाने तातडीने यासंदर्भात निर्णय घेतल्याचा आनंद व्यक्त केला. प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत घर बांधणीसाठी एक लक्ष २० हजार रुपये देण्यात येतात. त्यातील पहिला टप्पा आज १५ हजाराचा या लाभार्थ्यांना देण्यात आला. तर याच वेळी १ लक्ष ४९ हजार लाभार्थ्यांना मंजुरी पत्र देण्यात आले उर्वरित लाभार्थ्यांना देखील हा हप्ता मिळणार असल्याचे यावेळी खासदार डॉ. अजित गोपछडे यांनी सांगितले. नियोजनभवनातील या कार्यक्रमाला खासदार डॉ.अजित गोपछडे, मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल, विभागीय संगठन मंत्री संजय कौडगे,अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे प्रकल्प संचालक जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा डॉ. संजय तुबाकले, उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजकुमार मुक्कावार,संजय कोडगे, डॉ सचिन उमरेकर आदीसह शेकडो लाभार्थी उपस्थित होते. यावेळी बालेवाडी, पुणे येथील कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण लाभार्थ्यांना दाखविण्यात आले. सर्वसामान्यांचे स्वतःच्या घराचे स्वप्न साकार होण्यासाठी प्रधानमंत्री आवास योजना राबविण्यात येत आहे. या योजनेच्या दुसऱ्या टप्प्यात सन २०२४–२५ मध्ये जिल्ह्यात एक लक्ष 49 हजार घरकुलांना मंजुरी दिली आहे. यापैकी एक लक्ष 20 हजार लाभार्थ्यांना पहिला हप्ता वितरीत केला जात आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची प्रधानमंत्री आवास योजना ही महत्त्वाकांक्षी योजना असून या योजनेतून ज्यांना घर मिळाले आहेत त्यांना आणखीनही सुविधा उपलब्ध केल्या जातील. प्रत्येकाच्या घराचे स्वप्न पूर्ण व्हावे यासाठी वेळोवेळी या योजनेचा पाठपुरावा केला जाईल. सर्व लाभार्थ्यांना याचा लाभ मिळेल कोणीही या लाभापासून वंचित राहणार नाही असेही यावेळी खासदार डॉ.अजित गोपछडे यांनी सांगितले. प्रधानमंत्री आवास योजनेतील घरकुले गतीने पूर्ण करण्यासाठी जिल्हा प्रशासन कटिबद्ध असून लाभार्थ्यांनीही यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करणवाल यांनी केले. यावेळी उपस्थितांच्या हस्ते प्रातिनिधिक स्वरुपात निवडक लाभार्थ्यांना



मंजुरी आदेश आणि व काही लाभार्थ्यांना पहिल्या हप्त्याचे वितरण करण्यात आले.

# हनुमान नगर येथे मध्यरात्री वसरावर बिबट्याचा हल्ला

**दै. युवक आधार**
**विंचूर प्रतिनिधी जनार्दन चव्हाण**

**विंचूर येथून जवळच** असलेल्या हनुमाननगर येथे बिबट्याने वासरावर हल्ला करून फाडशा पाडल्या ची घटना शनिवारी मध्यरात्री घडली.हनुमाननगर परिसरात गेल्या महिनाभरापासून बिबट्या धुमाकूळ घालत आहे.त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.हनुमाननगर येथील शेतकरी दीपक साहेबराव गुंड ता.२२ शनिवारी रात्री झोपलेले असताना . त्यांच्या गायीच्या वासरावर मध्यरात्री बारा वाजेच्या सुमारास बिबट्याने हल्ला करून वासराचा फडशा पाडला. त्यानंतर सकाळपर्यंत बिबट्या वारंवार त्या ठिकाणी फिरुन येत होता.त्यामुळे पाळीव जनावरांची सुरक्षा धोक्यात असल्याचे नागरिकांकडून बोलले जात आहे.यामुळे भेदरलेले नागरिकांनी बिबट्याने वासरावर केलेल्या हल्ल्याचा व्हिडिओ सोशल मिडिया वर टाकून गावातील व परीसरात नागरिक एकमेकांना सावध राहण्याचे संदेश पाठवित आहेत.ज्ञानेश्वर भडांगे यांनी फोन वरून वन विभागाला माहिती दिली.वनविभागाचे अधिकारी जाधव हे तात्काळ येवून पंचनामा केला. वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी लवकरात लवकर पिंजरा लावून या बिबट्याचा बंदोबस्त करावा. त्यामुळे पुढे होणारे अनर्थ टाळले जातील. अशी मागणी हनुमाननगर येथील नागरिकांनी केली आहे.

